# ‘मेट्रो-३’च्या संचलनाची जबाबदारी ‘डीएमआरसी’वर

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** ‘कुलाबा - वांद्रे - सीप्झ मेट्रो ३’चे संचलन आणि देखभाल दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड (डीएमआरसी) करणार आहे. आंतरराष्ट्रीय स्पर्धात्मक निविदा प्रक्रियेनंतर हे कंत्राट डीएमआरसीला देण्यात आले. डीएमआरसीने सर्वात कमी बोली लावून हे कंत्राट मिळवले आहे.

एमएमआरसीकडून ३३.५ किमीच्या मेट्रो मार्गिकेचे काम सुरू असून ही मार्गिका आतापर्यंत पूर्ण होणे अपेक्षित होते. मात्र अनेक कारणांमुळे प्रकल्प अजूनही पूर्ण होऊ शकलेला नाही. पण आता मात्र एमएमआरसीने डिसेंबर २०२३ पर्यंत सीप्झ ते बीकेसी हा पहिला टप्पा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. उर्वरित दुसरा टप्पा जून २०२४ मध्ये सुरू करण्याचे एमएमआरसीचे नियोजन आहे. त्यामुळे आता एमएमआरसीने सर्व प्रकारच्या कामांना वेग दिला आहे. याचाच भाग म्हणून आता मेट्रो ३ चे संचालन आणि देखभालीसाठी



कंपनी नियुक्त करण्याची प्रक्रिया पूर्ण करण्याचा निर्णय घेतला आहे.

या निर्णयाप्रमाणे एमएमआरसीने २२ ऑक्टोबर २०२२ रोजी यासाठी निविदा जारी केली होती. डीएमआरसी आणि केओलिस या दोन कंपन्यांनी निविदा सादर केल्या होत्या. आता आर्थिक निविदा उघडण्यात आली असून यात डीएमआरसीने सर्वात कमी बोली लावली आहे. त्यामुळे नियमाप्रमाणे डीएमआरसीची निविदा अंतिम करत त्यांना कंत्राट देण्याचा निर्णय एमएमआरसीने घेतला असून शुक्रवारी यासंबंधीचा करार करून कंत्राटावर शिक्कामोर्तब करण्यात आले आहे. या करारानुसार आता मेट्रो ३ च्या संचलन आणि देखभालीची जबाबदारी डीएमआरसीची असणार आहे.